# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः06.06.2026** **वारःशनिवार**

---

1. 2025-26 या आर्थिक वर्षात 7 पुर्णांक 7 टक्के इतका दमदार विकासदर नोंदवणाऱ्या भारतीय अर्थव्यवस्थेचा पाया अत्यंत भक्कम असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
2. सर्व प्रमुख व्याजदर जैसे थे ठेवण्याचा आरबीआयचा निर्णय
3. 'गिलगिट-बाल्टिस्तान' मुद्यावरुन भारताची पाकिस्तानवर टिका आणि
4. भारताचा ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंद याचा 'नॉर्वे चेस' स्पर्धेत ऐतिहासिक विजय

**पंतप्रधान**

जागतिक आर्थिक संकट असूनही 2025-26 या आर्थिक वर्षात 7 पुर्णांक 7 टक्के इतका दमदार विकासदर नोंदवणाऱ्या भारतीय अर्थव्यवस्थेचा पाया अत्यंत भक्कम असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल केलं. गुजरातमधील दमण इथं एकंदर 2 हजार 970 कोटी रुपये खर्चाच्या विविध विकासकामांचे उद्घाटन केल्यानंतर जनसभेला संबोधित करताना ते बोलत होते. भारत जगातील सर्वाधिक वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक असून पायाभूत सुविधांचा विकास आणि गरिबांसाठीच्या कल्याणकारी योजनांना प्राधान्य देत, देश 'सुधारणांच्या प्रवासा'त वेगाने पुढे जाईल, अशी ग्वाही त्यांनी नागरिकांना दिली.

**पंतप्रधान-सुरत**

संपूर्ण जग हळूहळू हरित भविष्याकडे वाटचाल करत असून भारत या स्थित्यंतरात सक्रियपणे योगदान देत असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल केलं. गुजरातमधील सुरत इथं विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांचं लोकार्पण आणि पायाभरणी करताना ते बोलत होते. वडोदरा-मुंबई द्रुतगती महामार्गाच्या सहाव्या आणि सातव्या टप्प्याचं राष्ट्रार्पण यावेळी पंतप्रधानांनी केलं. या प्रकल्पामुळे गुजरात आणि महाराष्ट्रादरम्यान अतिजलद वाहतूक आणि दळणवळणाला मोठी चालना मिळणार आहे.

**सुरहा तलाव**

उत्तर प्रदेशातील बलिया जिल्ह्यातील जयप्रकाश नारायण पक्षी विहार अर्थात सुरहा तलावाला देशातील 100वे रामसर स्थळ म्हणून मान्यता मिळाल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आनंद व्यक्त केला आहे. ही मान्यता देशाच्या पाणथळ जागा आणि नैसर्गिक पर्यावरण संवर्धनाबाबतच्या बांधिलकीचे प्रतीक आहे. असं त्यांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**अमित शाह**

भारत-बांगलादेश सीमेवरील सुरक्षा व्यवस्था अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल त्रिपुरा इथं सीमा सुरक्षेबाबत आढावा घेतला. यावेळी लंकामुरा सीमा चौकी इथं सीमा सुरक्षा दलाच्या जवानांना त्यांनी संबोधित केला. त्रिपुरा फ्रंटियर आमच्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. त्रिपुरा असो किंवा बिहार, आम्ही लोकसंख्येच्या रचनेत बदल होऊ देणार नाही. हा आमचा ठाम संकल्प आहे, असं त्यांनी यावेळी सांगितलं. केंद्रीय सशस्त्र पोलीस दल आणि सीमा सुरक्षा दलाचे सर्व जवान प्रत्येक झाडाला आपला भाऊ, बहीण किंवा मूल समजून त्याची जपणूक करत आहेत. हा उपक्रम केवळ सरकारी आदेशांमुळे प्रेरित नसावा, तर ती आपली नैसर्गिक सवय बनली पाहिजे. हीच सवय आपले भवितव्य सुरक्षित ठेवू शकते, असं आवाहनही त्यांनी केलं.

**रेपोदर**

रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण आढावा समितीच्या द्वैमासिक बैठकीत घेतलेल्या निर्णयांची काल मुंबईत घोषणा  करण्यात आली. सर्व प्रमुख व्याजदर जैसे थे ठेवण्याचा निर्णय समितीनं घेतला आहे. त्यामुळं रेपो दर सव्वा 5 टक्क्यांवर कायम राहणार आहे. मात्र देशाचा आर्थिक वाढीच्या दराचा अंदाज 6 पूर्णांक 9 दशांश टक्क्यांवरुन कमी करून 6 पूर्णांक 6 दशांश टक्के केला आहे. जागतिक पुरवठा साखळीत निर्माण झालेले अडथळे, यंदा पाऊस कमी होण्याचा अंदाज यामुळं आर्थिक वाढीचा दर कमी होण्याची शक्यता गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी व्यक्त केली. तथापि जागतिक पातळीवर प्रतिकूल परिस्थिती असताना भारत समर्थपणे आर्थिक अडचणींना तोंड देत असल्याचं मल्होत्रा यांनी द्वैमासिक पतधोरण आढावा जाहीर केल्यानंतर पत्रकार परिषदेत बोलताना नमूद केलं. ग्राहक किंमत निर्देशाकांवर आधारित चलनफुगवट्याचा दर चालू आर्थिक वर्षात 5 पूर्णांक 1 दशांश टक्के राहील, असंही रिझर्व्ह बँकेनं म्हटलं आहे.

देशात चलनी नोटांकरता प्लॅस्टिकचा वापर करण्याचा विचार अगदी प्राथमिक पातळीवर असल्याचं त्यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितलं. बाजारात चलनी नोटांच्या उपलब्धतेवर रिझर्व बँकेचं लक्ष असून आवश्यक असेल तेव्हा नोटा उपलब्ध करुन दिल्या जातील असं त्यांनी स्पष्ट केलं. अधिकाधिक परकीय भांडवल भारतात आकर्षित करण्यासाठी काही उपायांची घोषणा रिझर्व्ह बँकेनं काल केली. त्यानुसार सरकारी कर्ज रोखे आता अधिक कालावधीसाठी जारी केले जाणार आहेत. याशिवाय परदेशात राहणाऱ्या भारतीय वंशाच्या नागरिकांना भारतीय शेअर बाजारात अधिक प्रमाणात गुंतवणूक करण्याची मुभा रिझर्व्ह बँकेनं दिली आहे.

**परकीय साठा**

पश्चिम आशियातील सुरू असलेल्या संकटाच्या पार्श्वभूमीवर देशाचा परकीय चलनसाठा 682 अब्ज डॉलर पेक्षा भक्कम पातळीवर असून हा साठा साधारण 11 महिन्यांच्या आयातीसाठी पुरेसा आहे. अशी माहिती मल्होत्रा यांनी दिली.

**सीबीएसई**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने अर्थात सीबीएसईनं इयत्ता 12 वी साठी गुण पडताळणी आणि पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत 7 जूनपर्यंत वाढवली आहे. विद्यार्थी आता उद्या मध्यरात्रीपर्यंत त्यांचे अर्ज सादर करू शकतात. अशी माहिती मंडळानं समाजमाध्यमावरील संदेशात दिली आहे. यापूर्वी आजपर्यंत अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत होती. सीबीएसईने सर्व पात्र विद्यार्थ्यांना वाढीव मुदतीची नोंद घेण्याचे आणि विहित वेळेत अर्ज प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन केले आहे.

**पाकिस्तान**

पाकिस्तानने बेकायदेशीरपणे आणि बळजबरीने बळकावलेल्या भारतीय प्रदेश असलेल्या, 'गिलगिट-बाल्टिस्तान' विधानसभेसाठी सार्वत्रिक निवडणुका घेण्याच्या पाकिस्तानच्या योजनांबाबत भारताने तीव्र निषेध नोंदवला आहे. या निवडणुका उद्या नियोजित आहेत. असं परराष्ट्र मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. 1947 मध्ये जम्मू-काश्मीरचं भारतात झालेले पूर्ण, कायदेशीर आणि अपरिवर्तनीय विलीनीकरण यामुळे, गिलगिट-बाल्टिस्तानसह संपूर्ण जम्मू-काश्मीर हा भारताचा अविभाज्य आणि अतूट भाग आहे, ही आपली भूमिका भारताने पुन्हा एकदा ठामपणे स्पष्ट केली आहे.

**पाकिस्तान**

पाकिस्तान संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेतील आपल्या तात्पुरत्या सदस्यत्वाचा गैरवापर करून जम्मू-काश्मीरबाबत चुकीचे दावे पसरवत आहे आणि त्यांनी आपल्या जबाबदाऱ्यांचे भान ठेवले पाहिजे. अशी टिका भारताचे स्थायी प्रतिनिधी पी. हरीश यांनी काल पाकिस्तानवर केली. संयुक्त राष्ट्र महासभेला सादर करण्यात आलेल्या सुरक्षा परिषदेच्या वार्षिक अहवालावरील चर्चेदरम्यान पाकिस्तानचे स्थायी प्रतिनिधी आसिम इफ्तिखार अहमद यांनी जम्मू-काश्मीरचा उल्लेख केला होता; त्याला प्रत्युत्तर देताना हरीश यांनी हे भाष्य केलं आहे.

**इराण-अमेरिका**

इराण-अमेरिका संघर्षात नव्यानं तणाव निर्माण झाला असून सागरी वाहतुकीला लक्ष्य करणाऱ्या इराणच्या चार ड्रोनना पाडल्यानंतर, अमेरिकन सैन्याने होर्मुझच्या सामुद्रधुनीजवळील इराणच्या किनारपट्टीवरील रडार यंत्रणांवर हल्ले केले आहेत. या संघर्षात इराणकडून हल्ल्याची योजना असल्याचं लक्षात घेता त्यापासून बचावासाठी 'गोरुक' आणि 'केशम बेटा'वरील इराणच्या रडार केंद्रांवर हल्ला केल्याचे अमेरिकेच्या 'सेंट्रल कमांड'ने सांगितलं.

**मणिपूर**

मणिपूरच्या कांगपोकपी जिल्ह्यात काल पुन्हा एकदा हिंसाचार उसळला. अज्ञात सशस्त्र हल्लेखोरांनी आदिवासीबहुल लोइबोल खुल्लेन गावावर हल्ला चढवला. या हल्ल्यात आणि त्यानंतर झालेल्या गोळीबारात एका महिलेसह तीन जणांचा मृत्यू झाला, तर अनेक घरे जाळण्यात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एका अज्ञात गटाशी संबंधित सशस्त्र सदस्यांनी गावावर अचानक हल्ला केला. या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून तिथं उपस्थित असलेल्या दुसऱ्या सशस्त्र गटाने गोळीबार सुरू केला.

**रशिया-भारत**

रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी 'स्टेल्थ' प्रकारातील लढाऊ विमान 'सुखोई एसयू 57' चं भारतात संयुक्त उत्पादन करण्याचा प्रस्ताव मांडला आहे. यातून दोन्ही देशांमधील मजबूत धोरणात्मक भागीदारी अधोरेखित होते. सेंट पीटर्सबर्ग इकॉनॉमिक फोरमच्या पार्श्वभूमीवर त्यांनी माध्यमांशी काल संवाद साधला. एकात्मिक हवाई संरक्षण प्रणाली आणि संबंधित हार्डवेअरसह इतर महत्त्वपूर्ण संरक्षण प्रणालींच्या बाबतीत भारतासोबत सहकार्य करण्याची तयारीही पुतिन यांनी दर्शविली. त्यांनी माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील भारताच्या भूमिकेचं कौतुक केलं.

**बुद्धिबळ**

नॉर्वेची राजधानी ओस्लो इथं सुरु असलेल्या बुद्धिबळ स्पर्धेत, भारताचा ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंद यानं जर्मनीच्या व्हिन्सेंट कीमरचा अंतिम फेरीत पराभव करून 'नॉर्वे चेस' स्पर्धेत ऐतिहासिक विजय मिळवला. हा विजय मिळवणारा तो पहिला भारतीय खेळाडू ठरला आहे. काल दिवसाची सुरुवात तिसऱ्या स्थानावरून करणाऱ्या प्रज्ञानंदने 'क्लासिकल' प्रकारात महत्त्वपूर्ण विजय मिळवून तीन गुण कमावले आणि एकूण 18 गुणांसह विजेतेपद निश्चित केलं.

**हवामान**

गेल्या दोन महिन्यांपासून सुरु असलेली उष्णतेच्या लाट कमी होण्याची शक्यता निर्माण झाली असून, गुरुवारी मान्सून केरळमध्ये दाखल झाला त्यानंतर मान्सूनच्या पुढील वाटचालीसाठी हवामानाची स्थिती अनुकूल आहे, अशी माहिती हवामान विभागाकडून देण्यात आली. मान्सूनचा उत्तर दिशेकडील प्रवास सुरू झाला आहे. उपग्रहाने दर्शवलेल्या अंदाजानुसार केरळ, कर्नाटक आणि गोवा किनारपट्टीवर भागात काल पर्जन्यमानाची स्थिती निर्माण झाली असून हा पट्टा तळकोकणाच्या जवळ पोहोचल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे लवकरच राज्यात मोसमी वाऱ्यांचे आगमन होईल, अशी शक्यता हवामान अभ्यासकांकडून व्यक्त केली जात आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार